**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.४८०/२०२०**
**सरकार/योगेश**
**नि.क्र. ९ खाली**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षिदार क्र. ३ याची साक्ष</u>**

**मी शपथेवर सांगते कि,**
**नाव – धनश्री रामेश्वर शेळके**
**वय – १९ वर्ष**
**धंदा – मजुरी,**
**राहणार– बेलोना, ता.नरखेड, जि.नागपूर**
**<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता श्री.जी.बी.राउत मार्फत शपथेवर सुरु</u>.**

१) घटनेची निश्चीत तारीख मी सांगू शकत नाही, परंतु घटना ४ ते ५ वर्षांअगोदर सकाळी १२ वाजाताच्या सुमारास माझ्या घराच्या अंगणात मी कपडे धुवत असताना घडली होती. मी कपडे धुवत असताना आरोपी योगश चक्रपाणी तेथे आला आणि मला भोसडाचोदी मस्तवाली का ? असे म्हणाला. मी घाबरून खंडारे यांच्या घराजवळ गेली व तेथून माझे वडील नामे रामेश्वर शेळके यांना मी फोन लावला. माझे वडील खंडारे यांच्या घराजवळ आले. माझे वडील आल्यानंतर मला म्हणाले की, त्यांनी माझ्या आईला फोन लावले आहे आणि ती येत आहे व भिऊ नको असे आश्वासन दिले. त्यानंतर माझी आई देखील त्या ठिकाणी आली आणि मी माझ्या आई–वडिलांसोबत मोवाड पोलीस चौकी येथे आरोपीविरूध्द तक्रार दिली. मला आता मी पोलीस स्टेशनला दिलेली तोंडी रिपोर्ट दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. १३** देण्यात येते. मला आता मी पोलीस स्टेशनला दिलेली छापील प्रथम खबर दाखवण्यात आली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. १४** देण्यात येते. पोलिसांनी माझ्याकडे घटनेबाबत चौकशी करून माझे बयाण नोंदवले. मी आरोपीला बघितल्यावर ओळखू शकते, तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण**

**<u>उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री. एम. आर. चरडे यांच्या तर्फे सुरू.</u>**

२) मला लिहिता वाचता येत नाही. पोलिसांनी बयाण व रिपोर्ट मला वाचवून दिखविली होती. मी पोलिसांना बयाण व रिपोर्ट देताना सांगितले होते की, घटना सकाळी १२ वाजता माझ्या घराच्या अंगणात घडली. मी पोलिसांना बयाण व रिपोर्ट देताना असेही सांगितले होते की, आरोपीने मला भोसडाचोदी, मस्तावली का असे म्हटले होते. मी पोलिसांना बयाण व रिपोर्ट देताना असेही सांगितले होते की, माझे वडील नामे रामेश्वर शेळके यांना मी फोन लावला. माझे वडील खंडारे यांच्या घराजवळ आले. माझे वडील आल्यानंतर मला म्हणाले की, त्यांनी माझ्या आईला फोन लावला आहे आणि ती येत आहे व भिऊ

नको असे आश्वासन दिले. पोलिसांनी वरील बाब माझ्या बयाण व रिपोर्टमध्ये का लिहिली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, पोलिसांनी मला माझे रिपोर्ट व फिर्याद वाचून दाखवताना वरील बाब रिपोर्ट व बयाणात लिहिली आहे असे सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, घटनेवेळी माझे आई–वडील घटनास्थळी उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि माझ्या आई–वडीलांमध्ये घटनेपूर्वी बोलचालीचे संबंध होते. घटनेनंतर आरोपी आणि आमच्यामध्ये बोलचाल बंद झाले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला टी.बीचे आजार असल्यामुळे तो घरीच राहत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला टी.बीचा आजार झाल्यामुळे त्याच्याशी व त्याच्या कुटुंबियांशी माझ्या आई–वडिलांना बोलचाल ठेवायचे नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वरील कारणामुळे मी व माझ्या आईने मिळून आरोपीविरूध्द खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीमध्ये आरोपीविरूध्द सांगितलेला मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आई–वडिलांच्या सांगण्यावरून खोटी तक्रार व बयाण देवून त्या अनुषंगाने मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
**स्वा/–**
**(रोहन विजयकुमार थाईल)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक १७.०६.२०२५.**

**समक्ष**
**स्वा/–**
**(रोहन विजयकुमार थाईल)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक १७.०६.२०२५.**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पी.डी.एफ. फाईल मधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव– तन्मय न. कांबळे (श्रेणी–३)**